



मोपा विमानतळावर ब्लू कॅप टॅक्सी काउंटर बंद करण्याची नोटीस पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



मुंबईला इंडियन्सचा थरारक विजय पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, १५ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 222 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 15 April 2025 | Pages 4 | ₹ 4

# कला अकादमीच्या निकृष्ट नूतनीकरणावर टीकेची झोड

## पुरूष नाटकावेळी गुणवत्ता अत्यंत सुमार असल्याचे उघड | कलाकारांकडून तीव्र नाराजी

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १४ : कोट्यवधी रुपयांचा खर्च करून नव्याने उभारण्यात आलेल्या कला अकादमीच्या नूतनीकरणाची गुणवत्ता अत्यंत सुमार असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. रविवारी संध्याकाळी दीनानाथ मंगेशकर सभागृहात 'पुरुष' या मराठी नाटकादरम्यान प्रकाशयोजनातील गंभीर बिघाड झाल्याने सादरीकरण सुमारे १५ मिनिटांसाठी थांबवावे लागले. या घटनेनंतर राज्य सरकारवर आणि संबंधित यंत्रणांवर कलाकार, राजकारणी आणि नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.**

नाटकादरम्यान उद्‌भवलेल्या तांत्रिक अडचणीमुळे प्रमुख कलाकार शरद पोंक्षे आणि स्पृहा जोशी यांना प्रेक्षकांची माफी मागावी लागली. पोंक्षे यांनी नंतर माध्यमांशी बोलताना कला अकादमीच्या व्यवस्थापनावर कठोर शब्दांत टीका केली. दीनानाथ मंगेशकर सभागृहासारख्या प्रतिष्ठित ठिकाणी अशी त्रुटी असणे हे दुर्दैवी आहे. प्रकाश व ध्वनी व्यवस्था ही रंगभूमीसाठी अत्यंत महत्त्वाची असते. मात्र येथे तिचा दर्जा अत्यंत खालावलेला आहे, असे ते म्हणाले.

गोवा फॉरवर्ड पार्टीचे अध्यक्ष व आमदार विजय सरदेसाई यांनीही या प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. शरद पोंक्षे यांनी उघड केलेल्या गैरव्यवस्थापनावर सरकारने गांभीर्याने विचार करून तात्काळ कारवाई केली पाहिजे. की गोवेकर कलाकार व कार्यकर्त्यांच्या मागण्या याप्रमाणे याहीवेळी दुर्लक्षच होणार? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी यावेळी भाष्य करताना सांगितले, सांस्कृतिकदृष्ट्या





महत्त्वाच्या असलेल्या या वास्तूचे अशाप्रकारे हाल होत असणे हे लज्जास्पद आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी तातडीने सुधारात्मक उपाय योजावेत. अन्यथा, सरकारकडून कला अकादमीच्या मृत्यूला आमंत्रणच दिले जात आहे.

कलाक्षेत्रातील कार्यकर्त्या सेसिल रॉड्रिग्ज यांनी सरकारवर कठोर शब्दांत टीका करत म्हणाले, सरकार नेहमी आपल्या कामाची स्तुती करत असते. मात्र, कला अकादमी ही त्यांच्या अपयशाचे ज्वलंत उदाहरण आहे. नूतनीकरणावर कोट्यवधी रुपये खर्च करूनही दर्जा अत्यंत निकृष्ट आहे.

कला अकादमी टास्क फोर्सचे सदस्य फ्रान्सिस कोएल्हो यांनी सांगितले की, शरद पोंक्षे यांनी जे सांगितले, तेच आम्ही वारंवार सांगत आलो आहोत. मात्र, सरकार आमचं ऐकत नाही. टास्क फोर्स असूनही कोणत्याही बैठकांचा पत्ता नाही. हे सगळे भ्रष्टाचाराचे फलित आहे. आज जे प्रकाशयंत्रणा सभागृहात आहे, ती थिएटरसाठी नसून डान्स बार किंवा डिस्को यासाठी योग्य आहे.

अभिनेता राजदीप नाईक यांनीही या प्रकरणी नाराजी व्यक्त केली. आम्ही वेळोवेळी कला अकादमीतील दोष निदर्शनास आणून दिले. मात्र, सरकारकडून केवळ समित्यांची स्थापना होते, प्रत्यक्ष कृती नाही. मुख्यमंत्री आणि भाजप अध्यक्ष दामू नाईक यांनी याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले.

या प्रकरणावर मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. पत्रकारांनी या संदर्भात विचारणा केली असता त्यांनी मौन साधले.

'पुरुष' या नाटकादरम्यान घडलेली घटना सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली असून, गोव्यातील सांस्कृतिक अधोरेखांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थेच्या कार्यक्षमतेबाबत नव्याने प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. नूतनीकरणाच्या नावाखाली सार्वजनिक निधीचा अपव्यय आणि व्यवस्थापनातील गंभीर त्रुटी यावर राज्य सरकारने तातडीने लक्ष घालणे आवश्यक असल्याचे मत सर्वच स्तरांतून व्यक्त होत आहे.

# बांगलादेशी बौद्ध भिक्षू गोव्यातून हद्दपार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** बनावट भारतीय पासपोर्टच्या आधारे ब्रिटनमध्ये जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका बांगलादेशी बौद्ध भिक्षूला गोव्यातून हद्दपार करण्यात आले आहे. गोव्यातील परदेशी प्रादेशिक नोंदणी कार्यालय यांनी ही कारवाई केली असून, संबंधित भिक्षूची रवानगी मुंबईमार्गे करण्यात आली.

गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात, मनोहर आंतरराष्ट्रीय विमानतळावर शौरब बरुआ (वय २५) या बांगलादेशी नागरिकास बनावट पासपोर्टसह अटक करण्यात आली होती. बरुआ युनायटेड किंग्डममध्ये जाण्याच्या प्रयत्नात असताना, विमानतळाच्या प्रस्थान इमिग्रेशन विभागाने त्याला ताब्यात घेतले होते. त्याने नाशिक येथून बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय पासपोर्ट मिळवला होता.

मोपा विमानतळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बरुआने २०२१ साली पर्यटक व्हिसावर चितगावहून भारतात प्रवेश केला. पश्चिम बंगाल मार्गे भारतात घुसखोरी केल्यानंतर, तो बिहारमधील बौद्ध तीर्थस्थळ गया येथे गेला होता. नंतर काही स्थानिक संपर्कांच्या मदतीने तो नाशिक येथे पोहोचला आणि तेथेच त्याने बनावट भारतीय पासपोर्ट मिळविला.

या प्रकरणाच्या तपासादरम्यान, नाशिक येथून अभियानंद उर्फ मुन्ना' रॉय याला अटक करण्यात आली. त्यानेच बरुआला बनावट पासपोर्ट मिळवून दिला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली. बरुआने या पासपोर्टच्या आधारे २०२२ मध्ये थायलंड आणि कंबोडियातही प्रवास केला होता. या प्रकरणाची सुनावणी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी , पेडणे यांच्या न्यायालयात झाली. सुनावणीदरम्यान बरुआने आपला गुन्हा कबूल केला. न्यायालयाने त्याला दोन महिने आणि १९ दिवसांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. शिक्षा पूर्ण केल्यानंतर त्याला देशाबाहेर हद्दपार करण्यात आले.

दरम्यान, मुन्ना रॉयविरुद्ध फॉरेनर्स ऑर्डर, १९४८ च्या कलम ७(१)(३), फॉरेनर्स ॲक्ट, १९४६ च्या कलम १४, पासपोर्ट एन्ट्री इन्टू इंडिया रूल्स, १९५० चे कलम ३(अ) व ६(अ), पासपोर्ट एन्ट्री इन्टू इंडिया ॲक्ट, १९२० चे कलम ३ व ४ आणि भारतीय दंड संहितेतील विविध कलमान्वये आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. त्याच्याविरुद्ध पेडणे न्यायालयात खटला सुरू आहे.

## निवडक

### बांगलादेशींना इस्रायलमध्ये बंदी

गाझा, दि. १४ : बांगलादेशमध्ये, मुहम्मद युनूस यांच्या अंतरिम सरकारने बांगलादेशी लोकांना इस्रायलमध्ये प्रवास करण्यास बंदी घातली आहे. गाझामध्ये इस्रायली सैन्याने केलेल्या हल्ल्यांचा निषेध नोंदवण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. सरकारने बांगलादेशी लोकांच्या पासपोर्टवर 'इस्रायलसाठी वैध नाही' असे लिहिण्यास पुन्हा सुरुवात केली आहे. २०२१ मध्ये शेख हसीना सरकारने पासपोर्टमधून ही ओळ काढून टाकण्याचे आदेश दिले होते. बांगलादेशच्या गृहमंत्रालयाने पासपोर्ट आणि इमिग्रेशन विभागाला परदेशात जाणाऱ्या नागरिकांच्या प्रवास परवान्यावर ही ओळ पुन्हा लिहिण्याच्या सूचना जारी केल्या आहेत 'हा पासपोर्ट इस्रायल वगळता सर्व देशांमध्ये वैध आहे.

---

### एसबीआयकडून व्याजदरात घट

नवी दिल्ली, दि. १४ : स्टेट बँक ऑफ इंडियाने मुदत ठेवी (एफडी) व्याज दरात ०.२० टक्क्यांपर्यंत कपात केली आहे. त्यानुसार जर तुम्ही एसबीआयमध्ये १ वर्षाची एफडी केलीत तर तुम्हाला ६.७० टक्के व्याज मिळेल. नवीन व्याज दर १५ एप्रिलपासून लागू होतील. आरबीआयने रेपो दरात कपात केल्यानंतर आता बँकाही एफडी व्याज दर कमी करत आहेत. याआधी अलीकडेच कॅनरा बँक आणि कोटक महिंद्रा बँकेनेही एफडीवरील व्याज दर कमी केले.

---

### रशियाचा युक्रेनवर क्षेपणास्त्र हल्ला

कीव्ह, दि. १४ : रशियाने युक्रेनच्या सुमी शहरावर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यामध्ये किमान ३४ जण ठार झाल्याची माहिती तेथील अधिकाऱ्यांनी दिली. रविवारी पाम संडे साजरा करण्यासाठी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी लोक जमले असताना सकाळी १०.१५च्या सुमाराला रशियाची दोन बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आदळली. या दुहेरी हल्ल्यानंतर बचावकार्य सुरू असल्याचे युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी सांगितले. युक्रेनच्या आपत्कालीन सेवा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या हल्ल्यांमध्ये किमान ३२ जणांचा मृत्यू झाला असून त्यामध्ये लहान मुलांचा समावेश आहे. तसेच १५ लहान मुलांसह अन्य ११७ जण जखमी झाले आहेत. अधिकृत वाहिन्यांवर दाखवण्यात आलेल्या या घटनेच्या ध्वनिचित्रफितीत काही मृतदेह जमिनीवर ढिगाऱ्यामध्ये पडले होते, तसेच शहरामधून धुराचे लोट येत होते.

---

### १८०० कोटींचा ड्रग्ज गुजरातमध्ये जप्त

सूरत, दि. १४ : गुजरात एटीएस आणि भारतीय तटरक्षक दलाला बेकायदेशीर ड्रग्ज तस्करीविरुद्ध मोठे यश मिळालं आहे. संयुक्त कारवाईअंतर्गत दोघांनीही ३०० किलो ड्रग्ज जप्त केले आहेत. ज्याची किंमत १८०० कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. अरबी समुद्रमार्गे ड्रग्ज तस्कर ते हिंदुस्थानात आणत होते. ही कारवाई १३ एप्रिलच्या रात्री करण्यात आली आहे. तटरक्षक दलाने याबाबत माहिती देताना सांगितलं आहे की, तटरक्षक दलाने गुजरात एटीएससोबत संयुक्त कारवाईत १२ आणि १३ एप्रिलच्या रात्री गुजरात किनाऱ्यावरील आंतरराष्ट्रीय सागरी सीमा सीमेवर १८०० कोटी रुपयांचे ३०० किलो ड्रग्ज जप्त केले. तटरक्षक दलाचे जहाज पाहताच तस्करांनी ड्रग्ज समुद्रात फेकून दिलं.

# फक्त रस्त्यांवरील अतिक्रमणांवरच कारवाई : माविन गुदिन्हो

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. १४ :** राज्य सरकार केवळ महामार्ग आणि रस्त्यांवरील अतिक्रमणांवरच कारवाई करणार असून, सर्वसामान्य नागरिकांची घरे पाडण्याचा कोणताही विचार नाही, अशी स्पष्ट भूमिका वाहतूक मंत्री माविन गुदिन्हो यांनी सोमवारी मांडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त चिखली येथे आयोजित कार्यक्रमात मंत्री गुदिन्हो बोलत होते. त्यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे नागरिकांमध्ये अनावश्यक भीती निर्माण झाली आहे. मात्र, मी सर्वांना आश्वस्त करतो की सरकार आपल्या जनतेच्या हितासाठी कार्यरत आहे. फक्त रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी आवश्यक असलेल्या भागात अतिक्रमण करणाऱ्या बांधकामांवरच कारवाई केली जाईल.

गुदिन्हो यांनी यावेळी काही लोकांकडून न्यायालयाच्या आदेशाची चुकीची माहिती पसरवली जात असल्याचे सांगितले. गोव्यात सुमारे ३०,००० घरे आहेत – आपण ती सर्व पाडण्याचा विचार कसा करू शकतो ? न्यायालयाने सरकारला हा विषय तार्किक आणि न्याय्य पद्धतीने हाताळण्याचे निर्देश दिले आहेत. आम्ही जनतेच्या हिताच्या दृष्टीनेच निर्णय घेणार आहोत. नागरिकांनी घाबरू नये; सरकार त्यांच्या पाठीशी उभे आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

याशिवाय, दाबोळी विमानतळाबाबत निर्माण झालेल्या अफवांवरही गुदिन्हो यांनी भाष्य केले. विरोधकांकडून दाबोळी विमानतळ बंद होणार असल्याच्या खोट्या बातम्या पसरवल्या जात आहेत. मात्र, प्रत्यक्षात तेथे प्रचंड हवाई वाहतूक सुरू असून, विमानांची संख्या वाढतच आहे, असे त्यांनी नमूद केले. सध्या विस्तारकामे सुरू असून, लवकरच नवीन हवाई पूलही सुरू होण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत विमानतळ बंद करण्याचा विचार करणेही शक्य नाही.

दाबोळी विमानतळाला एएआय संचालित सर्व विमानतळांमध्ये सर्वोत्तम विमानतळ घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे या बाबतीतील नकारात्मक प्रचाराला आता काही आधार उरलेला नाही, असे गुदिन्हो यांनी स्पष्ट केले.

# आयपीएल ऑनलाइन सट्टेबाजीचे सूत्रधार कोण ?

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** गोवा पोलिसांनी आयपीएल क्रिकेट सामन्यांदरम्यान सुरू असलेल्या बेकायदेशीर ऑनलाइन सट्टेबाजी प्रकरणात मोठी कारवाई करत अनेकांना अटक केली आहे. मात्र, या रॅकेटमागील मुख्य सूत्रधार अजूनही पोलिसांच्या टप्प्यात नाहीत. पोलिसांनी या गुन्ह्याच्या सखोल तपासाला सुरुवात केली असून प्रमुख बुकींचा शोध घेतला जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या व्यक्ती हे आंतरराष्ट्रीय मोबाईल ॲप्स व संशयास्पद वेबसाइट्सच्या माध्यमातून सट्टेबाजीचे व्यवहार करत होते. हे ॲप्स विदेशातून नियंत्रित केले जात



असून, ते वापरणाऱ्या प्रमुख गुन्हेगारांपर्यंत पोहोचणे पोलिसांसमोरील मुख्य आव्हान ठरत आहे.

गोवा पोलिसांच्या स्थानिक गुप्तचर यंत्रणेने या प्रकरणाचा पर्दाफाश केला. आयपीएल सामन्यांच्या कालावधीत काही संशयित व्यक्ती गोव्यातील विविध हॉटेलांमध्ये सतत बंद खोल्यांमध्ये राहत असल्याच्या माहितीवरून पोलिसांनी छापेमारी केली. संशयित हे एकाच वेळी १० ते १२ लॅपटॉप आणि डझनभर स्मार्टफोन वापरत असल्याचे निदर्शनास आले, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. सट्टेबाजी बॉल–टू–बॉल पद्धतीने, अगदी एका चेंडूसाठी सुद्धा केली जात आहे असेही त्यांनी सांगितले.

या प्रकरणाबाबत उत्तर गोव्याचे पोलिस अधीक्षक अक्षत कौशल यांनी सांगितले की, आम्हाला स्थानिक गुप्तचर यंत्रणेकडून मिळालेल्या माहितीनुसार, आम्ही चार वेगवेगळ्या पोलिस ठाण्यांच्या हद्दीत छापे टाकले. या छाप्यांनंतर अलीकडेच भारतीय दंड संहितेतील बीएनएसच्या अंतर्गत किरकोळ संघटित गुन्ह्यांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.कौशल यांनी सांगितले की, या प्रकरणात अजून अटक होण्याची शक्यता आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी अनेक जण गुजरात राज्यातील असून, त्यांची पार्श्वभूमी तपासण्यासाठी गोवा पोलिस अन्य राज्यांतील पोलिसांशी संपर्क साधत आहेत.


जप्त करण्यात आलेले स्मार्टफोन, लॅपटॉप आणि अन्य डिजिटल उपकरणे फॉरेन्सिक तपासासाठी वेर्णा येथील प्रयोगशाळेत पाठवण्यात आली आहेत. ही एक वेळखाऊ प्रक्रिया आहे कारण बहुतांश माहिती ही कोडेड आणि एन्क्रिप्टेड स्वरूपात आहे. सिस्टममध्ये प्रवेश करून ती माहिती क्रॅक' करावी लागेल,असे तपासात सहभागी असलेल्या दुसऱ्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

ही एक मोठी साखळी आहे जी पान २ ▶

# मेहुल चोक्सीला अटक बाकी ठगांचे काय ?

## भारताच्या महाठगांकडे अब्जावधींची मालमत्ता | भारतात आणण्याच्या प्रक्रियेत अडचणी

वृत्तसंस्था, दि. १४ : सीबीआयच्या विनंतीवरून फरार हिरे व्यापारी मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये अटक करण्यात आली. ही माहिती ऑल इंडिया रेडिओने एक्स वर दिली.हिरे व्यापारी मेहुल चोक्सी आणि त्याचा पुतण्या नीरव मोदी यांच्यावर पंजाब नॅशनल बँकेतून हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे.तथापि, या यादीत आणखी काही व्यावसायिकांची नावे आहेत, ज्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये गैरव्यवहाराचा आरोप आहे. भारतीय तपास संस्था देखील या व्यावसायिकांच्या प्रत्यार्पणाची वाट पाहत आहेत.यामध्ये मेहुल चोक्सी आणि इतर अनेकांचा समावेश आहे . २०१८ च्या सुरुवातीला पंजाब नॅशनल बँकेत हजारो कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आला. त्यानंतर बँकेने मेहुल चोक्सी, नीरव मोदी आणि इतर अनेकांविरुद्ध तक्रार दाखल केली होती. बँकेने दावा केला की या सर्व आरोपींनी बँक











अधिकाऱ्यांशी कट रचला होता आणि बँकेचे नुकसान केले होते.फेब्रुवारी २०१८ मध्ये अंतर्गत चौकशी पूर्ण झाल्यानंतर, पंजाब नॅशनल बँकेने बॉम्बे स्टॉक एक्सचेंजला फसवणुकीची माहिती दिली. मेहुल चोक्सी हा एकेकाळी भारतातील हिरे व्यवसायाचा पोस्टर बॉय होता.

पंजाब नॅशनल बँकेत झालेल्या हजारो कोटी रुपयांच्या घोटाळ्यात नीरव मोदी हा देखील आरोपी आहे. जानेवारी २०१८ मध्ये नीरव मोदी भारत सोडून गेला.नीरव मोदीला १९ मार्च २०१९ रोजी लंडनमधील होबर्न येथील मेट्रो बँकेच्या शाखेतून अटक करण्यात आली, जिथे तो त्याचे बँक खाते उघडण्यासाठी गेला होता. मे २०२० मध्ये, नीरव मोदीच्या प्रत्यार्पणाचा खटला लंडनमधील वेस्टमिन्स्टर मॅजिस्ट्रेट कोर्टात सुरू होता.नीरव मोदीचे कुटुंब गेल्या अनेक पिढ्यांपासून हिऱ्यांच्या व्यवसायात गुंतलेले आहे. नीरव मोदीने भारतातील किरकोळ दागिने कंपनी गीतांजली ग्रुपचे प्रमुख मेहुल चोक्सी यांच्यासोबत सुमारे १० वर्षे काम केले.यानंतर, नीरव मोदीने भारतात फायरस्टार डायमंड नावाची कंपनी सुरू केली.

भारत सरकारचा दावा आहे की किंगफिशर कंपनीचे मालक विजय मल्ल्या यांच्यावर भारतीय बँकांचे ९ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे.मल्ल्यावर त्याच्या किंगफिशर एअरलाइन्स कंपनीसाठी बँकांकडून कर्ज घेतल्याचा आणि ते परत न करता परदेशात गेल्याचा आरोप आहे. वाईट परिस्थितीतून गेल्यानंतर किंगफिशर एअरलाइन्स बंद पडली आहे.विजय मल्ल्या मार्च २०१६ मध्ये ब्रिटनला गेला होता. तेव्हापासून तो लंडनमध्ये राहत आहे. मल्ल्याला भारतात आणण्यासाठी भारतीय एजन्सी ब्रिटनच्या न्यायालयात कायदेशीर लढाई लढत आहेत.खरं तर, भारत आणि ब्रिटनने १९९२ मध्ये प्रत्यार्पण करारावर स्वाक्षरी केली होती, परंतु तेव्हापासून फक्त एकाच व्यक्तीचे प्रत्यार्पण करण्यात आले आहे.

आयपीएल म्हणजेच इंडियन प्रीमियर लीगचा माजी प्रमुख ललित मोदी २०१० पासून ब्रिटनमध्ये राहत आहे.आयपीएल प्रमुख असताना ललित मोदी याने लिलावात गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे.तथापि, त्याने नेहमीच हे आरोप फेटाळून लावले आहेत. दरम्यान, भारताने त्याचे प्रत्यार्पण करण्यासाठी अनेक अयशस्वी प्रयत्न केले आहेत.खरं तर, २००८ मध्ये आयपीएलच्या स्थापनेत ललित मोदीने महत्त्वाची भूमिका बजावली होती, जी आता अब्ज डॉलर्सचा उद्योग बनली आहे.ललित मोदी याच्यावरील मुख्य आरोप २०१० मध्ये दोन संघांच्या फ्रँचायझींच्या लिलावातील अनियमिततेशी संबंधित आहेत. त्यांच्यावर परवानगीशिवाय प्रसारण आणि इंटरनेट हक्क विकल्याचाही आरोप होता.२०१३ मध्ये, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने ललित मोदीला क्रिकेटच्या खेळांमध्ये सहभागी होण्यास आजीवन बंदी घातली.

गुजरातमधील एक मोठा उद्योगपती नितीन संदेसरा हा ५,७०० कोटी रुपयांच्या बँक फसवणूक आणि मनी लॉंड्रिंग प्रकरणात मुख्य आरोपी आहे. स्टर्लिंग बायोटेकचे मालक नितीन जे. संदेसरा याला फरार आर्थिक गुन्हेगार घोषित करण्यात आले आहे. या प्रकरणात हितेश नरेंद्रभाई पटेल, दीप्ती संदेसरा आणि चेतन संदेसरा हे देखील आरोपी आहेत.२०१७ मध्ये, दोन्ही एजन्सींनी तपास सुरू करण्याच्या काही दिवस आधी, कुटुंब भारत सोडून दुबईमार्गे नायजेरियाला पळून गेले. त्यानंतर संदेसरा कुटुंबाने नायजेरिया आणि अल्बेनिया या दोन्ही देशांचे नागरिकत्व स्वीकारले आहे.

### राय खूनप्रकरणी दोघा कामगारांना अटक

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि.१४: सांतेमळ, राय येथील राहत्या भाड्याच्या खोलीत करण्यात आलेल्या कामगाराच्या खूनप्रकरणी मायणा–कुडतरी पोलिसांनी दोघा सहकारी कामगारांना अटक केली. खगेश्वर साबार (४० वर्षे) या कामगाराचा शनिवारी रात्री उशिरा राहत्या खोलीत खून करण्यात आला होता तर रविवारी सकाळी हे खूनप्रकरण उघडकीस आले होते. याप्रकरणी मायणा–कुडतरी पोलिसांनी शशिबंत मांझी (४३ वर्षे) रबी मांझी २८ वर्षे) या दोघांना अटक केली असून, दोघेही जुनागड, ओडिशा येथील रहिवासी आहेत. न्यायालयासमोर उभे केले असता त्यांना आठ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. याप्रकरणी अधिक तपास सुरू असल्याची माहिती उपअधीक्षक सिद्धांत शिरोडकर यांनी दिली.

रविवारी सकाळी खूनप्रकरण उघडकीस आल्यावर मायणा–कुडतरी पोलीस स्थानकाचे निरीक्षक अरूण गावस देसाई यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथके तयार करून तपास सुरू करण्यात आला होता. खूनप्रकरण घडलेल्या ठिकाणी पान २ ▶

### हवामान

कमाल : ३३ किमान : २६

आर्द्रता : ६८

### बाजार भाव

सोने : ₹ ९६,३८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ९९,०९० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७५,३६५ .७७↑ (२४१.१६ )

निफ्टी : २२,८२८.९० ↑ (८३.९५)